
# पंचतंत्रातील गोष्टी

मोहन रावळ



परी प्रकाशन



**पंचतंत्रातील गोष्टी**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-




# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| कथा – १ ली | बैलाची भीती | ५ |
| कथा – २ री | अव्यापारेषु व्यापार | ७ |
| कथा – ३ री | स्वार्थ आणि समेट | १० |
| कथा – ४ थी | काडीने जंगल पेटले | १४ |
| कथा – ५ वी | गुरूला गंडा | १८ |
| कथा – ६ वी | सोंगाड्या लोहार | २१ |
| कथा – ७ वी | काळसर्पाची भीती | २७ |
| कथा – ८ वी | बगळा आणि खेकडा | २८ |
| कथा – ९ वी | बुद्धी त्यालाच बळ | ३१ |
| कथा – १० वी | मित्रभेट | ३४ |
| कथा – ११ वी | कोल्ह्याची चतुराई | ३६ |
| कथा – १२ वी | पडत्या फळाची आज्ञा | ३९ |
| कथा – १३ वी | टिटव्याचा गर्व | ४४ |
| कथा – १४ वी | मूर्ख कासव | ४५ |
| कथा – १५ वी | विचार–अविचार | ४६ |
| कथा – १६ वी | क्षुद्रांचा अपमान, तो राजाचा अपमान ! | ४८ |
| कथा – १७ वी | स्वार्थ कोणाला चुकला? | ५५ |
| कथा – १८ वी | व्यर्थ उपदेश | ६० |
| कथा – १९ वी | संतापी वानर | ६१ |
| कथा – २० वी | चोराच्या उलट्या बोंबा | ६२ |
| कथा – २१ वी | घातक सल्ला | ६५ |
| कथा – २२ वी | जशास तसे | ६७ |
| कथा – २३ वी | मूर्खाची संगत | ६९ |
| कथा – २४ वी | पापाचे प्रायश्चित्त | ७० |
| कथा – २५ वी | समदु:खी | ७२ |
| कथा – २६ वी | एकास भेटला दुसरा ! | ७८ |
| कथा – २७ वी | ब्राह्मणाच्या पत्नीला उपदेश | ७९ |
| कथा – २८ वी | वेळ प्रतिकूल होती | ८० |
| कथा – २९ वी | नशिबात असेल ते मिळते ! | ८३ |
| कथा – ३० वी | कर्म आणि कर्ता | ८[illegible] |


| | | |
|---|---|---|
| कथा – ३१ वी | धनाचे फायदे–तोटे | ८७ |
| कथा – ३२ वी | युद्धनीती | ९२ |
| कथा – ३३ वी | राजा कोण असावा? | ९५ |
| कथा – ३४ वी | बुद्धीने कार्य साधते | ९६ |
| कथा – ३५ वी | अतिविश्वास घातकच! | ९८ |
| कथा – ३६ वी | प्रवर्तकाची चाल | १०१ |
| कथा – ३७ वी | लोभी जावई | १०३ |
| कथा – ३८ वी | फायदा सगळा गेला | १०४ |
| कथा – ३९ वी | भिल्लाला पश्चात्ताप | १०५ |
| कथा – ४० वी | भांडणामुळे वाचला प्राण | १०७ |
| कथा – ४१ वी | सत्याची किंमत | १०९ |
| कथा – ४२ वी | जातीवरच जाणार शेवटी! | ११२ |
| कथा – ४३ वी | मूर्खांची बाजारपेठ | ११४ |
| कथा – ४४ वी | गुहा बोलली | ११५ |
| कथा – ४५ वी | शत्रूलाही पाठीवर घ्यावे लागते | ११७ |
| कथा – ४६ वी | विश्वासघातकी | ११९ |
| कथा – ४७ वी | आत्मघातकी कृत्य | १२२ |
| कथा – ४८ वी | मूर्ख शिरोमणी | १२४ |
| कथा – ४९ वी | कोण विश्वास ठेवणार? | १२८ |
| कथा – ५० वी | तेथे पाहिजे जातीचे! | १२९ |
| कथा – ५१ वी | बाईलवेडे भाऊ | १३१ |
| कथा – ५२ वी | रावजीचे गाढव | १३२ |
| कथा – ५३ वी | सज्जनाचा सल्ला | १३४ |
| कथा – ५४ वी | साम, दाम, दंड आणि भेद | १३५ |
| कथा – ५५ वी | आपलेच बेइमान | १३७ |
| कथा – ५६ वी | दिसते तसे नसते | १३९ |
| कथा – ५७ वी | अति लोभ वाईट | १४२ |
| कथा – ५८ वी | कमनशिबी कोण? | १४३ |
| कथा – ५९ वी | विद्या आणि व्यवहारज्ञान | १४७ |
| कथा – ६० वी | घातक घमेंड | १४८ |
| कथा – ६१ वी | काय चांदणे पडले आहे! | १५१ |
| कथा – ६२ वी | एकावर एक दोन | १५२ |
| कथा – ६३ वी | दिवास्वप्न | १५५ |
| कथा – ६४ वी | सोमनाथची सुटका | १५६ |
| पंचतंत्रातील काही सुविचार | | १५९ |

# कथा - १ ली  बैलाची भीती

कामनारूप नावाचे एक शहर होते. तेथे वाण्याचा शामकांत नावाचा एक तरुण मुलगा होता. त्याने अक्कलहुशारीने, सचोटीने खूप धन मिळवले होते. तरीसुद्धा तो समाधानी नव्हता. भरपूर संपत्ती जवळ असली तरी आणखी संपत्ती मिळवण्यात गैर काहीच नाही. ते तर आपले कर्तव्य आहे. संपत्ती ही जणू संजीवनीच असते. ती वृद्धाला तरुण बनवू शकते. पैसा असला की बेअकली माणसाला सुद्धा आपुलकीची वागणूक मिळते. मित्र आणि आप्तेष्ट मिळतात. पैसा असेल तरच किंमत असते. वृद्ध बापाला मुलं सांभाळतात अन्यथा कोण विचारतो?



पैसा मिळवण्याचे सहा मार्ग आहेत. ते असे – भिक्षा, राजसेवा, शेती, विद्यादान, सावकारी व व्यापार. जो व्यापार करतो त्याचा कोणी तिरस्कार करीत नाहीत. पण पिकते तेथे विकले जात नाही. शहाण्याने आपले उत्पादन परमुलखात विकावे असा विचार करून शामकांतने राजस्थानात खपला जाईल असा माल गोळा केला व बैलगाडीत भरून निघाला. त्याने सोबत म्हणून दोन तरुण बरोबर घेतले. त्याचया बैलगाडीला जोडलेल्या बैलांची नावे नंदन व वंदन होती. प्रवास सुरू होता. बैल धष्टपुष्ट होते. ते गाडी वेगात खेचत होते. परंतु नर्मदा नदी आडवी आली आणि तिच्या किनाऱ्यावरून जाताना



नंदन नावाच्या बैलाचा पाय मुरगळला. शामकांतचे नंदनवर भारी प्रेम होते. बैलाचा पाय मुरगळला तर होताच शिवाय तो चिखलातही रुतला होता.

शामकांतला नंदनची केविलवाणी अवस्था पाहून खूप वाईट वाटले. नंदनसाठी त्याने त्या नदीकाठी दोन दिवस दोन रात्री काढल्या. नंदनच्या पायाची सूज काही कमी होईना. तेव्हा बरोबर आलेले दोन तरुण म्हणू लागले, 'तुम्ही इथे असे फार काळ थांबणे योग्य नाही. इथे सिंहाचा व इतर जंगली प्राण्यांचा खूप उपद्रव आहे. थोडक्याकरिता सगळेच गमावून बसाल. जिवालाही धोका होईल.'

शामकांतला त्यांचे म्हणणे पटले. त्याने दोन तरुणांना गावात पाठवले व एक कामचलाऊ बैल आणवला. तो गाडीला जुंपून शामकांत पुढील प्रवासाला जाण्याच्या तयारीला लागला. परंतु नंदनला सोडून जाणे त्याच्या जिवावर आले. त्याने काही रक्कम त्या दोन तरुणांना देत म्हणाला, 'नंदन बरा होईपर्यंत येथेच थांबा व तो बरा झाला की त्याला घेऊन राजस्थानातील मिरची बाजारात या.'

शामकांत निघून गेल्यावर ते दोन तरुण हसत म्हणाले, 'याला माणसापेक्षा बैल जास्त प्रिय. हा पाय मोडका बैल आयताच सिंहाच्या तावडीत सापडणार आहे. मग बैलासाठी आपण का मरावे?' असा विचार करून ते निघून गेले.

नंदन या बैलाच्या आयुष्याची दोरी बळकट होती. नर्मदेच्या गार वाऱ्यामुळे नंदनला हुशारी वाटू लागली. कोवळे व पौष्टिक गवत खाऊन थोड्याच दिवसात नंदन तब्येतीने ठणठणीत झाला.

तो मातीत आपली शिंगे खुपसून माती उधळू लागला व डिरकू लागला. देव तारी त्यास कोण मारी? त्या जंगलात नंदन दाणदाण पावलं टाकत रुबाबात फिरू लागला. तो मोठ्या आवाजाने जंगल दणाणून सोडू लागला.

एकदा पंडरूक नावाचा सिंह आपल्या कुटुंबासह फिरत नर्मदेच्या काठावर आला असताना त्याच्या कानावर नंदनची गर्जना पडली. तसा पंडरूक मनातून घाबरला. हा आपल्यापेक्षा मोठा व ताकदवान नवा प्राणी जंगलात आला असावा असा विचार करून तो एका मोठ्या वडाच्या झाडाखाली कुटुंबासह बसला. तो जंगलाचा राजा असल्यामुळे त्याच्याभोवती इतरही प्राणी कोंडाळे करून बसले.

त्या प्राण्यात दोन कोल्हे होते. एकाचे नाव संचकल तर दुसऱ्याचे मंचकल होते. त्यांनी पूर्वी लबाडी केल्यामुळे त्यांना पदभ्रष्ट केले होते. पंडरूक राजाच्या मनातून ते उतरले होते. परंतु काहीतरी कर्तृत्त्व गाजवावे व पुन्हा सल्लागाराचे पद मिळवावे या प्रयत्नात ते होते. संचकल व मंचकल आपापसात हळू आवाजात बोलू लागले. संचकल म्हणाला, 'मंचकल, आपले पंडरूक महाराज नर्मदेवर पाणी पिण्यासाठी सहकुटुंब आले असताना असे पाणी न पिता गंभीर होऊन का बसलेत?'

'आपल्याला काय करायचं संचकल. त्यांनी आपल्याला पदभ्रष्ट करून एक पाचर जणू आयुष्याच्या लाकडात मारून ठेवली आहे. ती हलवायला गेलो तर आपलंच शेपूट अडकायचं त्या वानरासारखं!'

'वानरासारखं? ते कसं काय? मला ती गोष्ट सांगतोस?' संचकलने विचारले.


'ऐक हं–'

## कथा - २ री अव्यापारेषु व्यापार

मंचकल कोल्हा गोष्ट सांगू लागला.

एका नगरीतील नगरशेठ पुण्याईचं काम म्हणून गावात एक देऊळ बांधत होता. देवळातील तुळ्या, दरवाजे, खिडक्या लाकडी करावयाच्या असल्याने सुतार झाडाच्या सावलीत सुतारकाम करत होते. झाडावरचे एक वानर त्या सुतारांचे काम कुतूहलाने पाहत होते. सुतारांनी एक लाकडाचा सोट करवतीने अर्धवट चिरला व त्यात पाचर मारून ठेवली व सुतार जेवायला निघून

गेले. जेवून ते विश्रांतीसाठी झाडाखाली झोपले.




झाडावरचे वानर अर्धवट बांधलेल्या देवळावर आले. सुतार झोपले आहेत हे त्याने पाहिले व कापलेल्या लाकडी सोटावर बसून ते पाचर हलवत राहिले. पाचर उपसून येताच त्या वानराचे शेपूट लाकडात चिमटले. वानराने ओरडून गोंधळ घातला. अखेर त्याचे शेपूट तुटले. तेव्हाच त्याची सुटका झाली.

मंचकलने आपली गोष्ट पूर्ण करत म्हटले, 'असा अव्यापारेषु व्यापार आपण करूच नये. पंडरूकला सल्ला द्यायच्या भानगडीत न पडलेलं चांगलं!'

'आपण मग काय नुसते पंक्तीचे पाहुणे म्हणून जगायचं का?' संचकलने विचारले. तो पुढे म्हणाला, 'नुसतेच पोट भरायचे असेल तर कुठेही भरता येईल, पण चार लोकांचे कल्याण करायचे असेल तर राजाश्रयाची गरज असते आणि प्रसंगी आपण राजाला काही सुचवले तर त्यात गैर काहीच नाही, कारण आपले म्हणणे ऐकायचे का नाही; हे सर्वस्वी पंडरूक महाराजांच्या मर्जीवर आहे.'

'पण आपण पदभ्रष्ट झालेले सल्लागार आहोत. मग सल्ला द्यायच्या भानगडीत कशाला पडायचे?' मंचकल म्हणाला, 'न विचारता दिलेल्या सल्ल्याला किंमत नसते. प्रसंगी थट्टाच केली जाते.'

'असे म्हणू नकोस. कदाचित यात यशस्वी झालो तर आपल्याला प्रधानपद मिळेल. पंडरूक महाराजांच्या मनातील भीती घालवण्यातच माझे यश आहे.' संचकल ठामपणे बोलला.

'तू काय करणार आहेस?' मंचकलने विचारले.

'आपले पंडरूक महाराजांचे भीतीचे कारण विचारून, त्यांची भीती घालवण्याचा प्रयत्न करणार आहे. ही भीती घालवली की त्यांची माझ्यावर मर्जी होईल. राजाची मर्जी सर्वश्रेष्ठ असते मित्रा मंचकला! विद्वान लोक राजाश्रयानेच प्रतिष्ठा प्राप्त करतात.'

'पण पंडरूक महाराज भ्याले आहेत हे कसं काय म्हणू शकतोस तू?'

'ज्याला चेहरा वाचता येतो तो ज्ञानी. त्यांच्या हावभावावरून आणि बोलण्यावरून मी ओळखले आहे. मी त्यांना भयमुक्त करेन व प्रधानपद मिळवेन.' संचकल म्हणाला.

'ठीक आहे. माझ्या तुला शुभेच्छा आहेत!' मंचकलने अभिनंदन करत म्हटले.

संचकल पंडरूक सिंहाकडे गेला व अदबीने मुजरा करत म्हणाला, 'महाराजांचा विजय असो!'

'तू पदभ्रष्ट असलास तरी ती वेळ, तो राग राहिलेला नाही. तू स्वच्छ मनाने माझ्याशी बोल.' पंडरूक म्हणाला.

'महाराजांनी राग ठेवणे योग्यच नाही. श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ या सर्वांचीच गरज लागतेच. अगदी साध्या काडीनेही जंगलाला वणवा लागू शकतो. आपण जरी आम्हाला विचारत नव्हता, तरी अनुयायी बनून आम्ही तुमच्या पाठीशी होतो, तुमचे संकट आमचे समजले! आमचे सल्लागारपद परत द्याल तर बरे वाटेल.' संचकल म्हणाला.

'राजाने मनातले असमर्थांपुढे बोलू नये. काही गोष्टी अशामुळे कानोकानी पेरल्या जातात. त्यामुळे राजाची किंमत राहात नाही.' पंडरूक नाराजीच्या स्वरात म्हणाला.

'आपण पाणी पिण्यासाठी नदीकिनारी आला होता. पण पाणी न पिताच तृषार्थ होऊन येथे येऊन बसलात. याचे कारण कळू शकेल?'

'सहजच रे! विशेष काही नाही.' पंडरूक हसून मान फिरवत म्हणाला.

'तुम्हाला सांगायचे नसेल तर नका सांगू. काही गोष्टी सांगण्यासारख्या नसतात. काही गोष्टी पत्नीला सांगू नयेत, काही गोष्टी नातवंडांना सांगायच्या नसतात, काही गोष्टी मित्रांना सांगू नयेत तसेच काही गोष्टी सेवकांनाही सांगू नयेत. परंतु जे कोणी आपले शुभचिंतक असतात; त्यांना सांगायला हरकत नसावी.' संचकल म्हणाला. 'काही गोष्टींचे दुःख सांगूनच हलके होते.'

'संचकला, तू दुरून येणारे ते गुरगुरण्याचे आणि गर्जनेचे आवाज ऐकलेस का?' पंडरूकने विचारले.

'आवाज ऐकलेत ते मी! पण त्याचे काय महाराज?'

'त्या आवाजात धाक आहे. त्यामुळे हे जंगल सोडण्याचा मी विचार करत आहे.'

‘कशाकरिता?’ संचकलने पृच्छा केली.

‘आपल्या जंगलात कोणता तरी अद्‌भुत प्राणी आला आहे. तो या गर्जना करून धाक दाखवत आहे.’ पंडरूक सिंह म्हणाला. ‘त्याच्या गर्जनेप्रमाणे तो मोठा असणार आणि तसाच तो पराक्रमी असणार!’

‘छे! छे!! निव्वळ आवाजाला भिणे योग्य नाही. ढोल, शंख यांचेही आवाज मोठे असतात म्हणून कोणी त्यांना भीत नाही. शत्रू कितीही मोठा बलवान असला तरी ज्या राजाचा धीर सुटत नाही, त्या राजाचा पराभव होत नाही.’

‘असे म्हणतोस?’ पंडरूक साशंकतेने म्हणाला.

‘हो! याबद्दलची एक गोष्ट सांगतो ती ऐका.’ संचकल म्हणाला.

## कथा - ३ री स्वार्थ आणि समेट

एक माझ्यासारखाच कोल्हा रणांगणावर गेला. तिथले युद्ध नुकतेच संपले होते. काहीतरी खायला मिळेल या हेतूने तो फिरत असता, त्याचा ‘धडामऽऽ धुडूमऽऽ’ असे आवाज थांबून थांबून ऐकू येऊ लागले. कोल्हा घाबरला. दूर लपून बसला. आवाज तर येतो आहे, पण हालचाल मात्र कसलीच दिसत नाही. हे पाहून तो बाहेर आला व आवाजाच्या रोखाने दबकत निघाला. मनात तो घाबरला होता– ‘हा एवढा मोठा आवाज कदाचित माझा जीवच घेईल. तर हा वाजवणारा केवढा मोठा बलाढ्य असेल?’ या विचाराने तो थरथरत होता.

धीर करून धाडसाने तो पुढे गेला तेव्हा त्याला ढोल दिसला. वाऱ्यामुळे काही वेली त्या ढोलाच्या चमड्यावर आपटत होत्या. तसा आवाज होत होता. कोल्ह्याने पुढे जाऊन ढोल वाजवून पाहिला. तो भुकेने त्रस्त होताच. तो आनंदाने ओरडला, ‘यात खूप मांस असणार म्हणूनच आवाज येतो आहे.’

त्याने पंजा मारून मारून ढोलाचे कातडे फाडले व दातांनी ओढून काढले. मग त्या ढोलात त्याने प्रवेश केला. परंतु पोकळ ढोल पाहून तो दु:खी झाला.

‘महाराज, तुम्हाला माझ्या या गोष्टीतला मतितार्थ लक्षात आला असेलच. नुसत्या पोकळ गर्जनांना आपण भिऊ नये.’ संचकल म्हणाला.